


# अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

# महाराष्ट्र शासन





# राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम,2013

मानवी जीवनचक्रात प्रतिष्ठेचे जीवन जगण्यासाठी लोकांना परवडण्याजोग्या किंमतीने पुरेशा प्रमाणात दर्जेदार अन्न मिळण्याची खात्री देऊन अन्न व पोषणविषयक सुरक्षेकरिता आणि तद्नुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी अधिनियम.

# राज्य एक दृष्टीक्षेप

- राज्याची लोकसंख्या (2011 च्या जनगणनेनुसार) - 11.23 कोटी
- नागरी लोकसंख्येचे प्रमाण - 45 टक्के
- ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण - 55टक्के
- राज्यातील लोकांच्या आहरातील मुख्य घटक - तांदुळ, गहू,ज्वारी व बाजरी
- राज्यातील शिधापत्रिकांची संख्या (दि.1.10.2013 रोजी) - अंत्योदय - 24.71 लक्ष

  बी.पी.एल. - 42.96 लक्ष

  ए.पी.एल.(केसरी) - 144.53 लक्ष

  अन्नपूर्णा - 0.71 लक्ष

  शुभ्र - 19.18 लक्ष

  एकूण - 232.08 लक्ष

| | |
|---|---|
| ➢राज्यातील रास्तभाव दुकानांची संख्या | - 50,723 |
| ➢सद्यस्थितील लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत लाभार्थी | - 877.34 लक्ष |
| ➢लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत लाभार्थी प्रवर्ग | - अंत्योदय,<br>- बी.पी.एल.,<br>- ए.पी.एल.(केशरी) |
| ➢राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम,2013 अंतर्गत राज्यासाठी निश्चित करण्यात आलेला लाभार्थी इष्टांक | - 700.16 लक्ष |
| ➢राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम,2013 चा भाग नसलेले परंतु राज्य शासनाकडून लाभ द्यावयाचे लाभार्थी | - 177.19 लक्ष |

# राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम , 2013 मधील महत्त्वाच्या तरतुदी

**कलम-3**

या अधिनियमातील **कलम-3** नुसार सवलतीच्या दराने धान्य वितरणासाठी लाभार्थ्यांचे दोन गट असणार आहेत - 1) अंत्योदय अन्न योजना (AAY),

2) प्राधान्य कुटुंब (Priority Household),

**धान्य वितरणाचे प्रमाण-**

**(1)अंत्योदय अन्न योजनेत समाविष्ट** प्रति कुटुंबास प्रतिमाह 35 कि.ग्रॅ.

**(2) प्राधान्य कुटुंबात** (Priority Household) समाविष्ट कुटुंबास प्रति व्यक्ती प्रतिमाह 5 कि.ग्रॅ.

**सदरहू अधिनियमांतर्गत वितरित करण्यात यावयाच्या अन्नधान्याचे दर -**

| | |
|---|---|
| तांदूळ | - □ 3 /- प्रति कि.ग्रॅ. |
| गहू | - □ 2 /- प्रति कि.ग्रॅ. |
| भरड धान्य (ज्वारी,बाजरी,मका इ.) | - □ 1 /- प्रति कि.ग्रॅ. |

**कलम-4** **गर्भवती महिला व स्तन्यदा (Lactating )मातांना पौष्टीक आहार**

❖ गर्भधारणेच्या काळात व प्रसूतीनंतर सहा महिने- अंगणवाडीमार्फत मोफत आहार
❖ प्रसूतीलाभ- □6000/-पेक्षा कमी नसलेला (विहित हप्त्यात)
याबाबतची कार्यवाही महिला व बालविकास विभागाकडून करावयाची आहे.

**कलम-5** **बालकांना पौष्टीक आहार**

❖ वयोगट 6 महिने ते 6 वर्षे - वयानुसार योग्य असलेले, स्थानिक अंगणवाडीतून मोफत आहार
याबाबतची कार्यवाही महिला व बालविकास विभागाकडून करावयाची आहे.

❖वयोगट 6 ते 14 वर्षे - स्थानिक संस्था, शासकीय व शासकीय अनुदानित शाळा- मोफत मध्यान्ह भोजन (Mid-Day Meal)
याबाबतची कार्यवाही शालेय शिक्षण विभागाकडून करावयाची आहे.

**कलम-6** **बालकांमध्ये कुपोषण रोखणे**

❖कुपोषित बालकांची निवड करुन त्यांना विनामुल्य भोजन स्थानिक अंगणवाडीमार्फत देणे
याबाबतची कार्यवाही महिला व बालविकास विभागाकडून करावयाची आहे.

**कलम-8** **अन्न सुरक्षा भत्ता**

पात्र व्यक्तीस अन्नधान्य किंवा आहार न मिळाल्यास राज्य शासनाकडून अन्न सुरक्षा भत्ता देण्याची तरतूद सदर भत्याकरिता कालावधी व पध्दती केंद्र शासन निश्चित करेल.

**कलम-9** **राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम , 2013 मधील लोकसंख्येची व्याप्ती**

| | ग्रामीण | शहरी | एकूण |
|---|---|---|---|
| राष्ट्रीय | 75 टक्के (62.48 कोटी ) | 50 टक्के (18.86 कोटी ) | 67.21 टक्के (81.34कोटी ) |
| **महाराष्ट्र** | **76.32 टक्के (4.70 कोटी)** | **45.34 टक्के (2.30 कोटी)** | **62.30 टक्के (7.00 कोटी)** |

**कलम-10** प्राधान्य गटातील कुटुंबे निश्चित करण्यासाठी मार्गदर्शक सूचना

- अंत्योदय अन्न योजनेखालील सध्या अस्तित्वात असलेली सर्व कुटुंबे पात्र.
- प्राधान्य गट- लाभार्थी निवडण्यासाठी मार्गदर्शक तत्वे विहित करणे.
- पात्र कुटुंबाची यादी अद्ययावत करणे.

**कलम-11** पात्र कुटुंबाच्या यादीस प्रसिध्दी देणे

**कलम-13** महिला सक्षमीकरण

पात्र कुटुंबातील 18 वर्षांपेक्षा अधिक वयाची महिला शिधापत्रिकेकरिता कुटुंबप्रमुख राहील

**कलम-15** जिल्हा तक्रार निवारण अधिकारी

अन्नधान्य वितरणासंबंधी बाबीमध्ये व्यथित झालेल्या व्यक्तींची तक्रार दूर करण्यासाठी प्रत्येक जिल्हयासाठी तक्रार निवारण अधिकारी नेमणे. (राज्य शासनाने दिनांक 8.1.2014 च्या शासन निर्णयानुसार प्रत्येक जिल्हयाकरीता जिल्हाधिकारी यांची स्वतंत्र जिल्हा तक्रार निवारण अधिकारी म्हणून नेमणूक केली आहे.)

**कलम-16** राज्य अन्न आयोग

अधिनियमाच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण, मूल्यमापन व पुनर्विलोकन करणे आणि प्रभावी अंमलबजावणी करिता राज्य शासनास सल्ला देणे. (राज्य अन्न आयोग स्थापण्याची कार्यवाही अंतिम [illegible]

## **कलम-24** राज्य शासनाच्या जबाबदाऱ्या

- ❖राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम ,2013 ची **अंमलबजावणी** व त्याचे **संनियंत्रण** करणे.
- ❖धान्याचे विहित कालावधीत उचल व वाटप करणे.
- ❖धान्य/आहाराचा पुरवठा न केल्यास अन्न सुरक्षा भत्ता अदा करणे.
- ❖साठवणूकीची व्यवस्था तयार करणे व त्याचे व्यवस्थापण करणे.
- ❖रास्तभाव दुकानांना सार्वजनिक वितरण व्यवस्था (नियंत्रण) आदेश,2001 नुसार परवाने देण्याची व्यवस्था करणे.

## **कलम-33** शास्ती (Penalties)

कोणत्याही तक्रारीवर किंवा जिल्हा तक्रार निवारण अधिका-याच्या निर्णयाच्या अपिलावर निर्णय करताना लोकसेवक किंवा प्राधिकारी दोषी आढळून आल्यास रु.5000/- पर्यंत दंड करता येईल.

# राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, 2013 ची राज्यात अंमलबजावणी

- या अधिनियमानुसार राज्यातील सर्व जिल्ह्यातील सर्व पात्र कुटुंबांना **दिनांक 01 फेब्रुवारी,2014** पासून सवलतीच्या दराने अन्नधान्य नियमित वितरीत होईल.
- राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम,2013 च्या अंमलबजावणीचा **शुभारंभ दिनांक 1 फेब्रुवारी पासून होणार असल्याने ही माहिती संबधित पालकमंत्री दिनांक 26 जानेवारी, 2014** रोजी प्रजासत्ताक दिनाच्या भाषणामध्ये वृत्तपत्र प्रतिनिधींना व सर्वसामान्य जनतेला देतील.

# लाभार्थी निवड

- राज्यात 76.32 टक्के ग्रामीण (469.71 लक्ष) व 45.34 टक्के शहरी (230.45 लक्ष) पात्र लाभार्थी म्हणून निवडण्यात येत आहेत.


- पात्र लाभार्थ्यांमध्ये सध्याच्या अंत्योदय अन्न योजनेच्या व बी.पी.एल. च्या सर्व लाभार्थ्यांचा समावेश आहे.

- याव्यतिरिक्त ए.पी.एल. (केशरी शिधापत्रिकाधारक) लाभार्थ्यांपैकी शहरी व ग्रामीण भागासाठी कुटुंबाच्या एकत्रित वार्षिक उत्पन्नाच्या मर्यादा खालीलप्रमाणे आहेत-

| | |
|---|---|
| शहरी लाभार्थी | रुपये 15,001 ते 59,000 पर्यंत |
| ग्रामीण लाभार्थी | रुपये 15,001 ते 44,000 पर्यंत |

# शिधापत्रिकेवर शिक्के मारण्याची कार्यवाही

- राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम 2013 अंतर्गत पात्र लाभार्थ्यांसाठी सध्याच्या शिधपत्रिकेवर दोन प्रकारचे शिक्के मारणे बंधनकारक आहे
- **"कुटुंब प्रमुख"** शिधापत्रिकेवर नमूद कुटुंबातील जेष्ठ महिलेच्या नावासमोर
- **"प्राधान्य कुटुंबातील लाभार्थी"** शिधापत्रिकेच्या प्रथम पृष्ठावर "वरील उजव्या कोपऱ्यात"



प्राधान्य कुटुंबाचे

BPL

अनुक्रमांक YF No. 43715

कौटुंबिक पुरवठापत्रिका/शिधापत्रिका

शिधावाटप क्षेत्र खालापूर जिल्हा रायगड

कोड क्रमांक

अर्ज क्रमांक

नागरिकत्व भारतीय

कुटुंब प्रमुखाचे नाव श्री. गोरे धाकु जाधु

वय ...... संपूर्ण पत्ता

रा. पाटीलवाडी (वावर्ले)

ता. खालापूर जि रायगड

अर्जात नमूद केलेले कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. 98,000/-

गॅस वापरत असल्यास नोंदणीकृत ग्राहकाचे नाव

ग्राहक क्रमांक / मिटर क्रमांक ...... सिलिंडर एक / दोन

गॅस वितरकाचे नाव व ठिकाण

कुटुंब प्रमुखाची सही किंवा डाव्या हाताच्या आंगठ्याचा ठसा

| युनिटांची संख्या | | | निरीक्षक / शिधावाटप अधिकाऱ्याची सही |
|---|---|---|---|
| प्रौढ | मुले | युनिटे | |
| 2 | 0 | 8 | |

पुरवठापत्रिका / शिधापत्रिका दिल्याची तारीख 01/9/2003


नायब तहसिलदार (महसूल) खालापूर

निरीक्षक / पुरवठा अधिकाऱ्याची सही

जिल्हाधिकारी

नियंत्रक, शिधावाटप, मुंबई.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,



तहसिलदार खालापूर

जुना पुरवठा / शिधापत्रिका क्रमांक YE-0336082 दिनांक 6/3/2000

रास्तभाव / अ. शि. दुकान क्रमांक ...... संदर्भ क्रमांक

पुरवठापत्रिकेत / शिधापत्रिकेत समाविष्ट असलेली नावे

| अनु क्रमांक | नाव | वय | कुटुंब प्रमुखाशी नाते | निरीक्षक / शिधावाटप अधिकाऱ्याची सही |
|---|---|---|---|---|
| | गोरे धाकु जाधु | 60 | स्वतः | |
| | गोरे शेवंताबाई धाकु | 55 | पत्नी | 2+0=8 |

कुटूंब प्रमुख

नायब तहसिलदार (महसूल) खालापूर

## राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम ,2013 मध्ये समाविष्ट न होणारे सध्याच्या एपीएल (केशरी शिधापत्रिकाधारक) मधील 177 लक्ष लाभार्थी यांच्यासाठी तरतूद

❖राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम,2013 अंतर्गत केंद्र शासनाने दिलेल्या प्रमाणानुसार राज्यातील 700.16 लक्ष लाभार्थी संख्या निश्चित करण्यात आली आहे.

❖सध्याच्या लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत ए.पी.एल. (केशरी शिधापत्रिकाधारक) मधील ज्या लाभार्थ्यांचा समावेश राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम,2013 अंतर्गत लाभार्थ्यांमध्ये होऊ शकत नाही अशा उर्वरित सुमारे 177 लक्ष लाभार्थ्यांना **प्रचलित परिमाणानुसार** व **प्रचलीत दराने** **(**ए.पी.एल.दराने**)** धान्य वितरण सुरु ठेवण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

❖यासाठी राज्य शासनाच्या अर्थसंकल्पातून वार्षिक सुमारे □1200 कोटी खर्च करण्यात येणार आहे.

# नियतन वितरण आदेश काढण्याचे वेळापत्रक

- राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम,2013 अंतर्गत केंद्र शासनाने अन्नधान्य उचलीची कालमर्यादा 50 दिवसांऐवजी आता 30 दिवस केली आहे.
- पुढील महिन्याच्या उचलीचे वितरण आदेश (Delivery Order) चालू महिन्याच्या 1 तारखेस किंवा त्यापुर्वी प्राप्त करुन घ्यावेत.
- राष्ट्रीय अन्न् सुरक्षा अधिनियम 2013 ची अंमलबजावणी राज्यात दि.1 फेब्रुवारी 2014 पासून करण्यात येणार असल्याने लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत माहे जानेवारी 2014 साठी देण्यात आलेल्या अन्नधान्याच्या नियतनाची उचल व वाटप दि.20.01.2014 पूर्वीच पूर्ण करावी.

- माहे फेब्रुवारी 2014 च्या नियतनाची उचल ( राष्ट्रीय अन्न् सुरक्षा अधिनियमानुसार लाभार्थी विचारात घेऊन ) करण्यांकरीता सध्याच्या दराने प्रदान करुन Delivery Order तातडीने भारतीय अन्न महामंडळाकडून प्राप्त करुन घ्यावी व दि.25.01.2014 पर्यंत फेब्रुवारी महिन्यासाठीची धान्याची उचल पूर्ण करावी. सदरहू धान्य दि.31.01.2014 पर्यंत रास्तभाव दुकानास वाटपासाठी उपलब्ध करुन दि.1 फेब्रुवारी 2014 पासून सुधारित दराने पात्र लाभार्थ्यांना वितरीत करावे. यासाठी भारतीय अन्न् महामंडळाकडे सध्याच्या दराने जमा करण्यात आलेल्या रक्कमांचे केंद्र शासनाकडून सुधारित दराने नियतन प्राप्त झाल्यानंतर समायोजन करावे.
- माहे मार्च 2014 च्या नियतनाची उचल करण्याकरिता आवश्यक बाबींची पुर्तता दिनांक 31.01.2014 पुर्वीच करुन दिनांक 1 फेब्रुवारी 2014 रोजी Delivery Order भारतीय अन्न महामंडळाकडून प्राप्त करुन घ्यावी. माहे मार्च 2014 साठी दिलेल्या सूचना पुढील प्रत्येक महिन्याच्या नियतनासाठी लागु राहतील.
- तसेच पुढील महिन्याचे नियतन भारतीय अन्न महामंडळाकडून चालू महिन्यात पुर्णपणे उचलून नियतन महिन्याच्या 1 तारखेपूर्वी सर्व रास्त भाव दुकानांत उपलब्ध होईल यादृष्टीने

## या अधिनियमासंदर्भात क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या मुख्य जबाबदाऱ्या

| | | |
|---|---|---|
| 1 | विभागीय आयुक्त | विभागातील सर्व जिल्ह्यातील राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, 2013 च्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करणे. त्यांच्या मासिक बैठकीमध्ये या योजनेचा आढावा घेणे. |
| 2 | जिल्हाधिकारी व नियंत्रक शिधावाटप, मुंबई | राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, 2013 ची प्रभावीपणे व काटेकोरपणे अंमलबजावणी करणे. सदर योजनेच्या सुरुवातीच्या काळात प्रत्येक आठवड्यात बैठक घेऊन आढावा घ्यावा आणि अंमलबजावणीच्या उणीवांचे निराकरण करावे. |
| 3 | जिल्हा पुरवठा अधिकारी / अन्नधान्य वितरण अधिकारी/ उप नियंत्रक शिधावाटप | जिल्हाधिकारी/नियंत्रक शिधावाटप यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, 2013 च्या अंमलबजावणीची कार्यवाही करणे. |

| | | |
|---|---|---|
| 4 | तहसिलदार /<br>सहाय्यक अन्नधान्य<br>वितरण अधिकारी /<br>शिधावाटप अधिकारी | सदर अधिकारी त्यांच्या पुरवठाविषयक नियमित जबाबदा-या व्यतिरिक्त अधिनियमाच्या अंमलबजावणीसाठी पुढील जबाबदा-या पार पाडतील.<br>1)पात्र लाभार्थ्यांच्या यादया अंतिम करणे<br>2)यादया प्रसिध्द करणे<br>3)लाभार्थी निवडीबाबतच्या व अन्य आक्षेपांचे निराकरण करणे<br>4)रास्तभाव दुकानात विहित कालावधीत धान्य उपलब्ध असेल व अनुज्ञेयतेप्रमाणे लाभार्थ्यांस सर्वसाधारण दर्जाचे (F.A.Q.) धान्य वितरीत करणे.<br>5)भारतीय अन्न महामंडळाकडून प्राप्त झालेले F.A.Q. दर्जाचे अन्नधान्य अंतिमत: लाभार्थ्यांपर्यंत पोहचविण्याच्या दृष्टीने रास्तभाव दुकानदारांची मार्गदर्शनपर कार्यशाळा दिनांक 20 जानेवारी, 2014 पूर्वी घेणे.<br> |

# अन्नधान्याची प्रतवारी/दर्जा

- ❖ राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम,2013 नुसार लाभार्थ्यांना वितरित होणारे धान्य सर्वसाधारण दर्जाचे (F.A.Q.) राहील व अंतिम लाभार्थ्यांपर्यंत त्याच दर्जाचे धान्य वितरीत होईल यासाठी योग्य संनियंत्रण ठेवावे.

- ❖ वितरित करण्यात येणा-या धान्याच्या दर्जा संदर्भात सार्वजनिक वितरण व्यवस्था (नियंत्रण) आदेश,2001 मध्ये नमूद केलेली संयुक्त तपासणी तसेच शासनाकडून वेळोवळी दिलेल्या सूचनांचे पालन करुन वितरित करण्यात येणार धान्य हे सर्वसाधारण दर्जाचे (F.A.Q.) असेल याची दक्षता घ्यावी.

- ❖ या संनियंत्रणासाठी स्थानिक पातळीवरील **दक्षता समित्यांचा (Vigilance Committee)** प्रभावी वापर करावा.

# अन्नधान्य साठवणूक व्यवस्था

- राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, 2013 अंतर्गत अन्नधान्य साठविण्यासाठी तालुकानिहाय पुरेशी गोदाम व्यवस्था उपलब्ध करावी.
- नवीन गोदाम बांधकामे त्वरेने पुर्ण होण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावेत.
- नवीन गोदामे बांधकामांसाठी जमीन उपलब्धतेमध्ये काही अडचणी असल्यास त्या तात्काळ दूर करुन घ्याव्यात यासाठी विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी व्यक्तिश: लक्ष पुरवावे.

# द्वारपोच अन्नधान्य वाहतूक

- ❖ राज्य शासनाने दि.23.02.2012 च्या शासन निर्णयान्वये सुधारित वितरण प्रणालीचा (door step delivery system) अवलंब केला आहे.
- ❖ त्या अनुषंगाने राज्यात शासन निर्णय दिनांक 26.11.2012 नुसार भारतीय अन्न महामंडळ ते शासकीय गोदाम व शासकीय गोदाम ते रास्तभाव दुकानापर्यंत अन्नधान्य वाहतुकीसाठी जिल्हानिहाय कंत्राट निश्चितीसाठी निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आली होती.
- ❖ सदर निविदा प्रक्रिया मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या अंतरिम स्थगितीमुळे पुर्ण झालेली नाही.
- ❖ मात्र आता मा.उच्च न्यायालयाने दिनांक 7.1.2014 रोजी संबंधित याचिका निकाली काढल्या असून त्यानुसार निविदा प्रक्रिया बाबत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

## नवीन रास्तभाव दुकानांना परवाने देणे

❖ ज्या महसूली गावात रास्तभाव दुकाने नाहीत अशी गावे तसेच लोकसंख्येच्या प्रमाणात जेथे अतिरिक्त रास्तभाव दुकानांची आवश्यकता आहे अशी गावे विचारात घेता राज्यात आणखी एकूण 6782 रास्तभाव दुकानांची आवश्यकता असून आता पर्यंत 6685 नवीन दुकानांसाठी जाहिरनामे प्रसिध्द करण्यात आले आहेत.

❖मात्र त्यापैकी आतापर्यंत फक्त 664 रास्तभाव दुकाने मंजूर करण्यात आली असून उर्वरीत दुकाने मंजूर करण्याची कार्यवाही तातडीने होण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी स्वत: लक्ष देणे आवश्यक आहे.

# लाभार्थ्यांचा हक्क

- ❖ राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम,2013 नुसार विहित प्रमाणात अन्नधान्य मिळणे हा लाभार्थ्यांचा कायदेशीर अधिकार झाला आहे.
- ❖ विहित कालावधीत लाभार्थ्यांस धान्य न मिळाल्यास त्यांना अन्न सुरक्षा भत्ता दयावा लागेल.
- ❖ सदर बाब उदभवल्यास शासनास नागरीकांच्या रोषास सामोरे जावे लागेल.
- ❖ संबंधित अधिकाऱ्यास जबाबदार धरुन दंडनिय कारवाई करण्यात येईल.
- ❖ यास्तव शासनाची प्रतिमा मलीन होणार नाही यादृष्टीने राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, 2013 ची अंमलबजावणी सर्व संबंधितांनी काटेकोरपणे करणे आवश्यक आहे.

# <u>रास्तभाव दुकानदारांची जबाबदारी</u>

❖रास्तभाव दुकानास प्राप्त झालेले सर्वसाधारण दर्जाचे (F.A.Q.) अन्नधान्य अंतिमत: लाभार्थ्यांपर्यंत पोहचविण्याची रास्तभाव दुकानदारांची जबाबदारी राहील.

❖पात्र लाभार्थ्यांना विहित प्रमाणात, विहित दराने वेळीच धान्य उपलब्ध न केल्यास संबंधित  रास्तभाव दुकानदाराविरुध्द प्रचलित नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल.

❖सदर बाबी सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी रास्तभाव दुकानदारांच्या निदर्शनास आणाव्यात.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम,2013 ची अंमलबजावणी करणे हा राज्य शासनाचा महत्त्वपूर्ण व महत्त्वाकांक्षी कार्यक्रम आहे. त्यामुळे त्याची प्रभावी व यशस्वी अंमलबजावणी ध्येयपूर्वक (Mission Mode मध्ये ) करणे ही सर्वांची जबाबदारी आहे.



# धन्यवाद